# वसई - विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार
## जाहिर निविदा सूचना

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार कार्यक्षेत्रातील खालील उल्लेख केल्या प्रमाणे विकास काम करणेसाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी - १ नमुन्यात द्विलखोटा पद्धतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि.१२/०६/२०२६ ते दि.१९/०६/२०२६ या दिवशी सायं.४.०० वाजेपर्यंत सुट्टीच्या दिवसांखेरीज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार कार्यालयातील बांधकाम विभागात रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदा सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा व भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि १९/०५/२०२६ रोजी दु.४.०० वाजे पर्यत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार कार्यालयातील बांधकाम विभागाकडे बंद निविदा पेटीमध्ये टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार कार्यालयात निविदा समिती समोर हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी सायं.४.०५ वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. या कामी आलेल्या निविदा पैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्यांची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मु |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार मधील प्र.क्र.४४ (नविन प्र.क्र.८) मध्ये हरी दर्शन चाळ ते मुख्य गटारापर्यंत गटार बांधणे. | रु.४,२७,८१९/- | रु.४२७८/- | रु.५००/- + १८% जी.एस.टी ५९०/- | २% डी.डी.ने. व २% बिलातून | ६० दिवस |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार मधील प्र.क्र.७३ (नविन प्र.क्र.१९) मध्ये नवजिवन नगर येथे रोहीदास मोहीते घराजवळ ३ शिटचे शौचालय बांधणे. | रु.४,९४,४५२/- | रु.४९४५/- | रु.५००/- + १८% जी.एस.टी ५९०/- | २% डी.डी.ने. व २% बिलातून | ६० दिवस |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार मधील प्र.क्र.०५ (नविन प्र.क्र.१९) मध्ये हनुमान मंदिर डोंगरपाडा येथे ३ शिटचे शौचालय बांधणे. | रु.४,९४,४५२/- | रु.४९४५/- | रु.५००/- + १८% जी.एस.टी ५९०/- | २% डी.डी.ने. व २% बिलातून | ६० दिवस |

**अटी व शर्ती -**

टिप - निविदाकाराने निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करणेच्या आहेत.

१. वरील कामाकरिता लखोटा क्र.१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मान्यताप्राप्त ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र, आयकर नोंदणी प्रमाणपत्र, बयाणा रक्कमेचा धनाकर्ष, फॉर्म फी पावती झेरॉक्स, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय विभागाकडे कामांचे अनुभव दाखले, पॅन कार्ड इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. तसेच लखोटा क्र. २ मध्ये वित्तीय बोलीचा संच जोडणे आवश्यक आहे.

२. निविदेतील दर हे जी.एस.टी. व शासनाच्या अन्य करासहीत निविदा धारकांनी भरावयाच्या आहेत.

३. निविदा पत्राची रक्कम व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य राहील यामध्ये कोणत्याही प्रकारची सुट वजा सवलत ग्राह्य धरली जाणार नाही, याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी. करारनामा करतेवेळी अंदाजपत्रकीय रकमेच्या १% इसारा रक्कम म्हणून भरणे आवश्यक राहील. निविदा भरतेवेळी सादर केलेली बयाणा रक्कम २% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून समायोजित करण्यात येईल व देयकातून उर्वरीत २% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून कपात करण्यात येईल.

४. वरील दर्शविल्याप्रमाणे बयाणा रक्कमेचा भरणा आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या नावाने भरावयाचा आहे.

५. उपरोक्त नमूद कामाकरिता भरणा करण्यात आलेली सुरक्षा अनामत व बयाना रक्कम परताव्यासह दोष दायित्व कालावधी हा २ वर्ष राहील. काम पूर्ण होवून ०२ वर्ष होईपर्यंत कामात काही बिघाड झाल्यास, नादुरुस्त झाल्यास त्याची दुरुस्ती निविदाधारक यांनी स्वखर्चाने करुन देण्याची आहे. सदर कालावधीमध्ये कामाची समाधानकारक गुणवत्ता राहील्यास तद्नंतर रक्कम विहीत कालावधी संपल्यावर निविदाधारकास प्रदान करणेत येईल.

६. वरील काम अंदाजपत्रकानुसार करण्यात यावीत. कामात वाढ केल्यास सदरील वाढीव कामाचे अतिरीक्त खर्च/बील अनुज्ञेय असणार नाही.

७. वरील काम विहीत कालावधीमध्ये पुर्ण करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील. कामाच्या मुदतीच्या आत काम न केल्यास कमीत कमी रुपये ५००/- प्रती दिन किंवा जास्तीत जास्त अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% रक्कम दंड स्वरुपात आपले देयकातून कपात करण्यात येईल. आणीबाणीच्या स्थितीत उक्त कामास मुदतवाढ दिल्यास निविदाधारकास पूर्व मंजूर कराने काम करणे बंधनकारक राहील.

८. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन किमतीच्या १ टक्के एवढया रकमेचा धनाकर्ष निविदेच्या लिफाफा क. २ मध्ये सावर कराया तसेच निविदाधिन कामाच्या १० टक्केपेक्षा जादा दराची असेल तर देकार जेवढया कमी दराने कमी आहे तेवढया रकमेचा प्रती १ टक्के प्रमाणेचा धनाकर्ष लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा. (उदा. १४ टक्के कमी दर १० टक्केपर्यंत करीता १ टक्का व १४ टक्के १० टक्के-४ टक्के असे एकूण ५ टक्के असा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत सादर करावा आवश्यक आहे.

९. मंजूर निविदा धारकांनी निविदांतील कामांचे किंमतीनुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १५५८ कलम ३४ मध्ये दि. २४/०४/२०१५ च्या शुद्धीपत्रकानुसार रक्कम रु.१० लाखापर्यंत रु.५००/- व त्यावरील प्रलोक लाखास रु.१००/- प्रमाणे मुद्रांक देणे व त्याबर करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

१०. कोणत्याही परिस्थितीत Price Escalation देण्यात येणार नाही. तसेच सदर काम हे शासकीय निधीमधून करण्यात येणार असून निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्रगतीनुसार देयक अदा करण्यात येईल. अंदाजपत्रकाचे रक्कमेपेक्षा जादा काम झाल्यास त्या कामाचे देयक जादा अदा करणेत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

११. Dy Directorate of insurance Maharashtra State vide letter No.क्र. प्रविनि-२३१४ देयक कपात रक्कम/अभि-३ दि. ३१/०३/२०१५ अन्वये रु.२५ लाखापर्यंतच्या ०.५०% विमा व त्यावरील रु.२५ लाखावरील कामासाठी १% विमा उतरविणे आवश्यक आहे. सदर विमा न उतरविल्यास वरील प्रमाणे विमा रक्कम देयकातून कपात केली जाईल.

१२. वरील कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या गौण खनि‍ज स्वामित्व धन भरणा केल्याचे प्रमाणपत्र तसेच कामामध्ये वापरलेले साहित्याचे गुण परिक्षण अहवाल (Test report) व शासननिर्णय २८ मार्च २०१८ नुसार त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण अहवाल (Third Party audit report) करुन या कार्यालयास प्राप्त झाल्याशिवाय कंत्राटदारास अंतिम देयक अदा केले जाणार नाही.

१३. कामाच्या ठिकाणी कंत्राटदारास कामाचे फलक यामध्ये कामाचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम व काम करणारी यंत्रणा इत्यादी बाबीचा उल्लेख असलेला नामफलक स्वखर्चाने कामाचे दर्शनी भागास लावावा लागेल तसेच रस्त्यालगत पाईपलाईन खोदाई करावयाची झाल्यास वाहतूक व रहदारीस कोणताही अडथळा येऊ न देण्याची तसेच खोदकाम केलेला रस्ता पुर्ववत करुन देण्याची जबाबदारी मंजूर निविदा धारकास राहील.

१४. निविदाकार यांनी निविदेमध्ये दिलेले दर निविदा उघडलेच्या दिनांकापासून ९० दिवसांपर्यंत ग्राहय राहतील.

१५. निविदा सुचना ही कामाच्या करारनाम्याचा भाग राहील

१६. बयाणा रक्कम निविदा सादर करतेवेळी अंदाजपत्रकाच्या १ टक्के रक्कम भरणे आवश्यक राहिल. तसेच करारनामा करतेवेळी २ टक्का सुरक्षा अनामत रक्कम व निविदा भरतेवेळी भरलेली बयाना रक्कम समायोजित करून अशी एकूण २ टक्के सुरक्षा बनामत रक्कम वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे जमा राहिल. उर्वरित ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम देयक देतेवेळी देयकातून कपात करणेत येईल.

१७. नियमानुसार शासकीय कपाती करण्यात येईल.

१८. सदर काम शासकीय योजने अंतर्गत मंजूर असल्याने विहीत मुदतीत काम करणे बंधनकारक असून निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्याने देयक अदा करणेत येईल.

१९. निविदेसोबत सादर करण्यात येणारे निविदा दर व सत्य प्रतिज्ञापत्र निविदा धारक उक्त निविदेच्या कामाच्या स्वरुपाचा पुर्ण आभ्यास करून तसेच कामगार साहित्य उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन कामाचे दर व प्रतिज्ञापत्र सादर केल्याचे गृहीत धरण्यात येईल, वरील सर्व कामांसाठी निविदेसोबत जोडलेले [अपलोड केलेले] सर्व कागदपत्रे खरी असलेबाबतची प्रतिज्ञापत्र [परिशिष्ट-१] [ सत्य प्रतिज्ञापत्र affidavit] रक्कम रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र. ०१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२०. वरील सर्व कामांसाठी महानगरपालिकेची अधिन किंवा महानगरपालिकेने वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंग किंवा आमचेशी भागिदारी नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र [परिशिष्ट अ] [ सत्य प्रतिज्ञापत्र affidavit] रक्कम रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र. ०१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२१. वरील सर्व कामांसाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी संबंधीत विभागाकडे जमा करणेसाठी भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणित प्रत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील, निविदाधारकास काम मंजूर झाल्यानंतर पुढील अट क्र.२२ ते ३९ या अटींचे पालन करणे आवश्यक असेल.

२२. काम सुरु करण्यापूर्वी कामासंबंधी आवश्यक त्या सर्व सूचना अभियंता यांचेकडून घेऊन नंतरच निविदाधारक यांनी कामास सुरुवात करण्याची आहे. तसेच काम सुरु करण्याची तारीख महानगरपालिकेस निविदाधारक यांनी आगावू कळविणेची आहे.

२३. कामाचे अंदाजपत्रक स्पेसिफिकेशन वगैरेच्या बाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी निविदाधारक यांची आहे.

२४. अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत सर्व कामे विहीत मुदतीत समाधानकारक पुर्ण करुन देण्याची जबाबदारी निविदाधारक यांची आहे. तसेच कामांचा वेळोवेळी प्रगती अहवाल निविदाधारक यांनी महानगरपालिस कळविणेचा आहे.

२५. निविदाधारक यांनी समाधानकारक काम पुर्ण न केल्यास अगर अर्धवट सोडून दिल्यास या कामासाठी भरलेली बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेचा

अधिकार आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना आहे. त्याबाबतची निविदाधारक यांची कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच सदर काम अन्य मक्तेदाराकडून निविदाधारक यांनी करुन घेतल्यास महानगरपालिकेचे जे नुकसान होईल ते निविदाधारक यांनी बिनतक्रार भरुन देण्याचे आहे. अन्यथा नुकसान भरपाईची रक्कम आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना निविदाधारक यांच्या इतर देय रकमेतून कायदेशीर तरतुदीप्रमाणे वा अन्य प्रकारे वसूल करण्याचा अधिकार राहील.

२६. निविदाधारक यांचे काम समाधानकारक आहे अशी संबंधित अधिकाऱ्यांची खात्री झाल्यास निविदाधारक यांना कामाची रनिंग बिले अदा करणेत येतील. काम पुर्ण झाल्यावर अंतिम बिल निविदाधारक यांच्या मागणी अर्जानुसार अदा करणेत येईल.

२७. कामाचे जागेवर निविदाधारक यांनी स्वतः हजर राहणेचे आहे. कामासाठी वापरण्यात येणारे मटेरियल निविदाधारक यांनी व्यवस्थित साठा करुन ठेवणेचे आहे. त्याचप्रमाणे कामाचे साहित्य महानगरपालिकेच्या इंजिनियर / लिपिक यांनी पसंत केल्यानंतर कामास वापरण्याचे आहे. नापसंत केलेले साहित्य निविदाधारक यांनी जागेवरून २४ तासात स्वखर्चाने हलविणेचे आहे. साठा करून ठेवलेल्या मटेरियलमुळे तसेच काम चालू असताना वाहतूकीस अडथळा येणार नाही याची दक्षता निविदाधारक यांनी घ्यावयाची आहे.

२८. कामासाठी लागणारे सर्व साहित्य निविदाधारक यांनी स्वतः आणणेचे असून सर्व साहित्य जागेवर आणताना त्यावरील सर्व प्रकारचे कर भरणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहील. अंदाजपत्रक अंदाजे असल्यामुळे कमी जास्त होणारे कामाप्रमाणे प्रत्यक्ष मोजणी होवून बिल निविदाधारक यांना अदा करणेत येईल.

२९. जागेवरील परिस्थितीप्रमाणे मंजूर कामात काही कारणास्तव वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी घट केल्यास त्यामुळे कमी होणाऱ्या कामाबाबतची कोणत्याही प्रकारे नुकसान भरपाई निविदाधारक यांस मिळणार नाही.

३०. सदर कामावर निविदाधारक यांच्या वतीने कोणीही इसम अगर मजूर कामावर नेमल्यानंतर कोणत्याही कारणास्तव त्यांना नुकसान भरपाई देणेची झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारक यांची आहे. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांजकडे कोणत्याही प्रकारची मागणी करता येणार नाही. कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अपघात होऊन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणेची झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

३१. सदर कामासाठी लागू असणारा GST, आयकर तसेच निविदाधारकानी त्यांच्या अखत्यारित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा (EPF) भविष्य निर्वाह निधी, ESIC व इतर कपाती शासन निर्णयाप्रमाणे करण्याच्या जबाबदारी संबंधित निविदाधारक यांची राहील.

३२. देयक अदा करणेपूर्वी संबंधित निविदाधारकाने GST INVOICE, EPF व ESIC भरलेचे चलन सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा देयक अदा केले जाणार नाही यांची संबंधित ठेकेदाराने नोंद घ्यावी.

३३. शासकीय लेखापरिक्षण (Local fund Audit, AG. Audit Mumbai Any Other Audit Conducted by state government) झाल्यानंतर त्यामध्ये निविदाधारक यांचे कामाबाबत काही वसूली निघाल्यास ती विनाविलंब तसेच विना तक्रार आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी सांगितल्याप्रमाणे जमा करणेची आहे.

३४. सदरचे काम करत असताना आवश्यक ती सर्व सुरक्षा व काळजी निविदाधारक यांनी स्वखर्चाने घ्यावयाची आहे. सदर काम करत असताना कसलाही अपघात घडल्यास होणाऱ्या जिवीत व वित्त हानीस निविदाधारक जबाबदार राहतील. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. सदर कामाच्या ठिकाणी काम चालू असल्याचा फलक लावणे बंधनकारक आहे.

३५. सदरचे काम कोणत्याही कारणामुळे अपूर्ण राहिल्यास अथवा रद्द झाल्यास निविदाधारक वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडे कसलीही भरपाई मागू शकणार नाहीत.

३६. काम चालू असताना आवश्यक तर रात्रीच्या वेळी कामावर वॉचमन निविदाधारक ठेवतील. तसेच धोक्याची सूचना देणाऱ्या लाल दिव्याची व्यवस्था निविदाधारक

यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

३७. कामाच्या आवश्यक त्या बाबींचे टेस्ट रिपोर्ट सक्षम प्राधिकरणाचे निविदाधारक यांनी सादर करणे बंधनकारक राहील.

३८. सदर निविदेमध्ये व सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती तसेच महानगरपालिकेकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करणे निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील.

३९. कामांचे सुरु होण्याअगोदरच व काम सुरु असताना टप्याटप्प्याने तसेच काम पूर्ण झाल्यानंतरचे सर्व GEO tag असलेले छायाचित्र तारखेसह या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४०. कोणत्याही स्पष्टीकरणाकरीता निविदाधारकाने दुरध्वनी क्र. ०२५०२५२५१०५ शी संपर्क साधावा.

४१ पत्र व्यवहाराकरीता संपर्क व्यक्ती व पत्ता उपअभियंता, बांधकाम विभाग, प्रभाग समिती 'एफ' धानिव पेल्हार कार्यालय असा राहील.

४२. कोणत्याही कारणाशिवाय निविदा रद्द करणेचा किंवा स्विकारण्याचा अधिकार आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वविशम/बांध/प्र.स.एफ /१६७/२०२६
दि. १० /०६/२०२६

सही/-
(स्वाती देशपांडे)
उपआयुक्त, परिमंडळ -४
वसई-विरार शहर महानगरपालिका

c:\users\vvmc\desktop\offnine C-5.docx